**प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय**
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५५५६७३, फॅक्स क्रमांक ०७१२-२५५०६७५,
इ-मेल : apccfprotection@mahaforestgov.in , ccfforestregulation@yahoo.com website-

क्रमांक:अप्रमुवसं(संरक्षण)/कक्ष१८/प्रक्र.२७/**३४६**/२०-२१
नागपूर ४४०००१, दिनांक १४ डिसेंबर, २०२०

# परिपत्रक

**विषय:-** वनगुन्हे हाताळण्याबाबतची कार्यपध्दती.

**संदर्भ:-** शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्रमांक टीआरएस ०४/२९४/प्रक्र ७२/ फ-६
दिनांक १३/०८/२०१४

संदर्भिय शासन निर्णयात वनसंरक्षणाचे मापदंड विशद करण्यात आले आहे. त्यातील परिच्छेद क्र. ६ ते ९ मध्ये गुन्हे हाताळण्याबाबत निर्देश आहेत.

नुकत्याच प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र वनसंहिता २०२० खंड -२ मधील परिच्छेद क्र. ६.१२ मध्ये यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती नमूद करण्यात आली असुन सुलभ संदर्भासाठी त्याची प्रत **सहपत्र -१** म्हणून या सोबत सहपत्रित आहे. क्षेत्रीय अधिका-यांच्या सोईसाठी सदर कार्यपध्दतीचा मराठी भाषांतर सुध्दा या परिपत्रकासोबत **सहपत्र -२** म्हणून सहपत्रित असून सर्व पातळीवर त्याचे काटेकोरपणे पालन होईल, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी.

**सहपत्र:-** वरील प्रमाणे

(संजीव गौड)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ, नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
महाव्यवस्थापक, वनविकास महामंडळ (सर्व)
मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (प्रा) (सर्व)
क्षेत्र संचालक, व्याघ्र राखीव (सर्व)
उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी (प्रा) (सर्व)
उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी (प्रा) (सर्व)
उपसंचालक, व्याघ्र राखीव (सर्व)
विभागीय वन अधिकारी (प्रा) व (वन्यजीव) सर्व
विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ (सर्व)
सहाय्यक वनसंरक्षक (सर्व)
वनपरिक्षेत्र अधिकारी (सर्व)

**प्रतिलिपी** :- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

**Annexure-1 of the Circular of the Additional Principal Chief Conservator of Forests (Protection), Maharashtra State, vide No. Desk-18/CR-27/2020-21/346 dated 14.12.2020**

**PARA 6.12 OF VOLUME 2 OF THE MAHARASHTRA FOREST MANUAL 2020**

**6.12 Offence Related Procedure—**The term, 'Offence' has been defined in section 2(n) of the Code of Criminal Procedure, 1973. The term, 'forest-offence' has been specifically defined under the Indian Forest Act, 1927 in context of offences dealt under that Act. Thus, in absence of specific definition related to offence in the Acts, viz. the Wild Life (Protection) Act, 1972, the Forest (Conservation) Act, 1980 and other Acts, the term 'offence' must be reckoned as it is defined in the Code of Criminal Procedure, 1973. Procedures for dealing such offences and officers to carry out functions and duties viz. arrest, seizure, investigation, inquiry, receiving evidence during such inquiry and investigation, compounding, confiscation, eviction, disposal of property seized in offence, filing complaint in the Court of law etc. are dealt either in the above mentioned Acts or rules made or statutory powers conferred thereunder. In absence of specific provisions in respect of any of such proceedings in any Act, provisions prescribed in the Code of Criminal Procedure, 1973 shall be applicable, as stipulated in section 4 and 5 therein. Relevant statutory provisions, which come across by forest-officers are covered in CHAPTER 3 of this Volume. Administrative functions and duties assigned to officials in Forest-Department are covered in CHAPTER 4 of the Volume I. This segment covers the general procedure for dealing in offences, for the purpose of ensuring uniformity, without any prejudice to statutory provisions.

**I-FIRST REPORT**

**6.12.01** FIRST REPORT Book or more commonly known as POR or FOR (Preliminary Offence Report or First Offence Report) book, containing Forms in quadruplicate (in four copies), prescribed by the State Government from to time in that regard shall be maintained and furnished up to the level of forest-guards.

**6.12.02** If a forest-guard detects an offence, he shall register the same in his First Report. If the knowledge of the same is obtained from an informer, the forest-guard shall proceed at once to the place, and after verifying the facts, shall make his First Report without delay. He shall thereafter, retain the first copy (Counterfoil) with himself and shall dispatch within 24 hours, the second, third and fourth copy directly to the Round Officer, Division Office and Range Office respectively.

**6.12.03** If the offence is so registered by any other forest-officer, he shall ensure that authenticated copies of POR so registered, shall reach to officers, mentioned above, without any delay.

**6.12.04** Forest-guard shall always carry his First Report Book with him and shall produce it for inspection on demand by his official superior.

**6.12.05** The First Report shall on no account be enclosed in a packet with other papers, and the envelope containing it shall be distinctly marked as **"FIRST REPORT".**

## II-INVESTIGATION REGISTER AND REPORT

**6.12.06** Every Round Officer shall maintain an "Investigation Register" in the prescribed form and immediately on receipt of a First Report in accordance with para 6.12.02 above, or immediately after recording the offence himself as the case may be, shall fill the Entries to that effect in that Register.

**6.12.07** He shall thereafter, carry out the investigation into forest-offence and submit his Investigation Report to the RFO within a period of 15 days. He shall also complete the Entries to that effect in the Investigation Register. The Round Officer shall ensure that the fullest possible investigation is made, including the drawing up of the Panchanama, obtaining undertaking in the prescribed form, if the accused person is willing to compound the offence, the recording of statements of the accused person and witnesses concerned, if any. The accused person must always be formally asked to cite witnesses, and should he refuse to do so, it should be recorded as part of the statement.

**6.12.08** No letter or statement of his own opinion is to accompany the Investigation Report. However, documents to that effect may be embodied in his Statement as a witness for the prosecution and attached to the Report.

**6.12.09** The above procedure is applicable for Round officers who are entrusted with the duty to carry out Investigation under the Indian Forest Act, 1927.

**6.12.10** Except for making the investigation, all other procedures mentioned above, shall be applicable to the offences under the Wild Life (Protection) Act, 1972 also. For the purpose of making investigation into offences under the Wild Life (Protection) Act, 1972, powers under section 50(8) of that Act have been conferred to the officers not below the rank of Assistant Conservator of Forests. Clauses (a) to (d) of the said sub-section empower the Investigating Officers with certain other powers also. Thus, investigation into offences under the Wild Life (Protection) Act, 1972, made by any other officer, who is not empowered u/s 50 (8) of that Act, shall not be tenable in the subsequent trial before the Court or in other proceedings before any other Authority. Notwithstanding the above, the forest-officials, below in rank to the officials empowered under section 50(8) are duty-bound to discharge duties cast upon them under sub-sections (1), (3) and (4) of section 50 of the said Act. In fact as per the express provisions contained under sub-section (5), failure in performing duties mentioned under sub-section (4), makes the person concerned guilty of an offence against the said Act.

**III- RANGE OFFENCE REGISTER**

**6.12.11** The R.F.O. shall maintain the Range Offence Register in his Office.

**6.12.12** After receiving Investigation Report as stated above, if, based on the official records or as per his own knowledge, it comes to the notice of the R.F.O. that any previous warning or conviction or reason for special punishment, which has not been recorded by the Round Officer in his Investigation Report, he shall incorporate the same in the case papers, along with corroborative documents to that effect. No addition or alteration may on any excuse be made in the Investigation Report.

**6.12.13** The RFO himself is invested with the powers contained in section 72 of the Indian Forest Act, 1927, which include the powers to hold an inquiry into forest-offences and in the course of such inquiry, to receive and record evidence. Thus, so far as the offences under the Indian Forest Act, 1927 are concerned, the RFO shall exercise powers conferred to him under that Act.

**6.12.14** If, in the opinion of the RFO, the investigation made by the Round Officer is complete in all respect, he shall forward the same to the Assistant Conservator of Forests / Sub-Divisional Forest Officer, forthwith, recording his remarks separately, to proceed in accordance with section 68 or section 61-A, as the case may be, of the Indian Forest Act, 1927. If, considering the merit of the case, he is of the opinion that the case deserves to be prosecuted before the Court of Law, he shall proceed to file complaint before the Court of law. In the cases recommended to the ACF / Sub DFO for confiscation proceedings, if required, the RFO shall also ensure to file complaint before the Court of law without waiting for the outcome of the confiscation proceedings. Unlike the provisions contained in the Wild Life (Protection) Act, 1972, no restrictions are stipulated in the Indian Forest Act, 1927, as to officer of which rank shall be competent to file the Complaint in the Court of Law. Therefore, there is no bar in filing of the Complaint by a Forester or a Forest-guard. However, as an abundant precaution and in order to adequately safeguard the interests of the Government, if the Complaint is to be filed by the Forester or Forest guard, it shall always be desirable that the Draft of the Complaint must be approved beforehand by the RFO.

**6.12.15** If however, in the opinion of the R.F.O. further investigation is required, he shall on no excuse return the papers to the Round Officer, but shall himself, proceed, with the least possible delay, to make such further investigation and proceed in accordance with law, by adopting procedure mentioned in para 6.12.14.

**6.12.16** On the other hand, in case of offences under the Wild Life (Protection) Act, 1972, for the purposes of making investigation, to issue search warrant, to

enforce the attendance of witnesses, to compel the discovery and production of documents and material objects and to receive and record evidence under section 50(8) are invested with officers not below the rank of the Assistant Conservator of Forests. Thus, offences related to the Wild Life (Protection) Act, 1972 must be dealt by the officers competent in that regard, accordingly.

**IV- ACF OFFENCE REGISTER**

**6.12.17** The ACF has been empowered for exercising powers under sections 61-A and 68 of the Indian Forest Act, 1927 and sections 53, 54 of the Maharashtra Land Revenue Code, 1966. He shall therefore examine the case and shall pass appropriate order under the relevant Statute, depending upon the merit of the case in accordance with law and shall forthwith, forward the certified Copies of his Order to concerned Parties, the RFO and DCF / DFO. The certified copy of the order passed under section 61-A shall also be submitted to the Authority under section 61-C. The ACF shall retain and preserve the original case papers with him as they may be required during subsequent proceedings, if any, before the Revision or Appellate Authorities under above mentioned Statutes or in the proceedings before any other statutory authority. However, he shall provide certified copies of such case papers on request from the RFO concerned to that effect.

**6.12.18** In respect of offences under the Wild Life (Protection) Act, 1972, after completion of the investigation, if he is of the opinion that the case deserves to be prosecuted in the Court of law, he shall, himself file the Complaint in the Court of Law or shall direct the RFO concerned to do so, under intimation to the DCF/DFO. If he considers that the matter deserves to be dealt u/s 54, he shall submit his Report to that effect to the DCF / DFO accordingly.

**V- DIVISIONAL FOREST REGISTER**

**6.12.19** The DCF / DFO shall maintain a “Divisional Offence Register”. Information about each and every First Report, Investigation, Inquiry, Filing of Complaint, Order of Compounding, Confiscation etc. contemplated in the Indian Forest Act, 1927, the Wild Life (Protection) Act, 1972, the Forest (Conservation) Act, 1980 etc. and orders passed u/s 53, 54 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 and all intermediate stages as reported by the subordinate officials from time to time after registration of offences, shall be entered into this Register promptly from time to time.

**6.12.20** The DCF / DFO shall ensure that the Divisional Offence Register is maintained update and all periodical reports related to offence cases are submitted to the official superiors based on this Register.

**6.12.21** He shall scrupulously monitor the offence cases, in respect of which Complaints have been filed in the Court of Law and depending on the merit of the case, shall ensure that such cases are attended by the officer of appropriate seniority, who is conversant with the matter.

**6.12.22** He shall also ensure that complaints are filed on time in Court of law in respect of cases, which deserve to be prosecuted in the Court of Law.

**6.12.23** DCF / DFO is also empowered u/s 61 of the Indian Forest Act, 1927. However, he shall be careful while using such powers and shall communicate the Orders passed under this provision to his official superiors.

**6.12.24** For removal of doubts, it is clarified that the powers under section 61-A, 68 of the Indian Forest Act, 1927 and that under section 53, 54 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 have also been delegated to the DCF / DFO. Thus, while exercising such powers, DCF / DFO shall follow the same procedure as laid down in respect of the ACF.

**VI-GENERAL**

**6.12.25** From the date of the First Report it shall be the duty of the R.F.O. and the ACF concerned (and still more of DCF / DFO) to watch the progress of the case and each of such Officers in his own jurisdiction, shall ensure that offence cases are dealt in accordance with law and without undue delay.

**6.12.26** The DCF / DFO shall ensure that the decision as to an offence case under the Indian Forest Act, 1927 and / or the Wild Life (Protection) Act, 1972 is to be prosecuted before the Court of Law must be taken within a period of 60 days from the date of its detection. Cases to be dealt under section 61-A of the Indian Forest Act, 1927 and 53, 54 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 must also be filed before the competent authorities under those statues within the said time limit of 60 days. He shall also ensure that Cases to be dealt under section 68 of the Indian Forest Act, 1927 or section 54 of the Wild Life (Protection) Act, 1972 must be disposed of within the same time frame.

**6.12.27** So far as offences under the Forest (Conservation) Act, 1980 are concerned, the Central Government may, by notification, authorize any officer not below

the rank of Conservator of Forests or the concerned forest officer having territorial jurisdiction over the forest land in respect of which the said offence is said to have been committed , to file complaints against the person(s) prima-facie found guilty of offence under the Act or the violation of the rules made thereunder in the court having jurisdiction in the matter. Accordingly, powers to file complaint in the Court have been delegated to the officers in the Regional Office of the Ministry of Environment, Forest and Climate Change under Rule 9 of the Forest (Conservation) Rules, 2003. The DCF / DFO shall personally examine the cases in respect of offences registered under the Forest (Conservation) Act 1980. Thereafter, if he comes to the conclusion that it deserves to be prosecuted before the Court of Law, the formal proposal for filing the complaint under rule 9, complete in all respect along with authenticated copies of case papers, including authenticated English Translation (wherever required) must be submitted to his official superior within 75 days.

**6.12.28** It will be noted that this procedure refers exclusively to offences under the Indian Forest Act, 1927, the Wild Life (Protection) Act, 1972 and the Forest (Conservation) Act, 1980. It is on no account to be applied to offences under the I.P.C., or any other Act. Such cases shall be reported forthwith to the police or the Competent Authority under intimation to the official superiors.

# अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य यांचे कडील परिपत्रक क्र. कक्ष-१८/प्रक्र.२७/३४६/ दि. १४.१२.२०२० मधील सहपत्र-२

## महाराष्ट्र वन संहिता, खंड-२, परिच्छेद-६.१२ (मराठी भाषांतर)

### ६.१२ गुन्ह्याशी संबंधित कार्यपध्दती

'गुन्हा' हा शब्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २(n) मध्ये परिभाषित करण्यात आलेला आहे. 'वनगुन्हा' हा शब्द भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत हाताळले जाणारे गुन्ह्यांसुदर्भात विशिष्टपणे परिभाषित करण्यात आलेला आहे. सबब, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व इतर अधिनियमात गुन्ह्यांशी संबंधित विशिष्ट परिभाषेच्या अभावी, 'गुन्हा' हा शब्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये परिभाषित केल्या प्रमाणे समझला गेला पाहीजे. असे गुन्हे हाताळण्याची कार्यपध्दती व अटक, जप्ती, तपास, चौकशी, अश्या चौकशी व तपासादरम्यान पुरावे गोळा करणे, तडजोड, सरकारजमा करणे, निष्कासन, गुन्ह्यात जप्त मालमत्तेची विल्हेवाट लावणे, न्यायालयात तक्रार दाखल करणे, इत्यादी कार्य व कर्तव्ये बजविणारे अधिकारी, वर नमूद कायद्यात अथवा त्याअंतर्गत केलेल्या नियमावल्या अथवा प्रदान करण्यात आलेल्या वैधानिक शक्तीनुसार निर्धारित आहेत. कोणत्याही अधिनियमात अश्याप्रकारच्या कार्यवाही करीता विशिष्ट तरतुद नसल्यास, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४ व ५ मध्ये विहीत केल्यानुसार त्यास उक्त संहितेचे तरतूदी लागू राहतील. वन अधिका-यां समोर येणारे संबंधित वैधानिक तरतूदी या खंडाचे प्रकरण-३ मध्ये समाविष्ट आहेत. वनअधिका-यांना सोपविण्यात आलेले कार्य व कर्तव्ये खंड क्रमांक एक मधील प्रकरण-४ मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. वैधानिक तरतूदींचे कोणतेही पूर्वाग्रह न ठेवता, एकरुपता सुनिश्चित करण्याचे उद्देशाने या भागात गुन्हे हाताळण्याबाबत सर्व सामान्य कार्यप्रणाली अंतर्भूत करण्यात आली आहे.

#### I-प्रथम अहवाल

**६.१२.०१** राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केल्या नुसार, चार प्रतित नमूने असणारे प्रथम अहवाल पुस्तक, अधिक सामान्यपणे 'पी.ओ.आर.' किंवा 'एफ.ओ.आर.' (प्राथमिक गुन्हा अहवाल किंवा प्रथम गुन्हा अहवाल) म्हणून ओळखली जाणारी पुस्तके राखण्यात येतील व वनरक्षक स्तरापर्यत उपलब्ध करून देण्यात येतील.

**६.१२.०२** जर वनरक्षकाला गुन्हा आढळला, तर तो आपल्या प्रथम अहवालात त्याची नोंद घेईल. जर त्यासंदर्भात माहिती एखादया खब-याकडून प्राप्त झाली तर वनरक्षक तात्काळ घटना स्थळी जाईल आणि वस्तुस्थितीची पडताळणी करुन विना विलंब प्रथम अहवाल तयार करेल. तद्नंतर तो प्रथम प्रत (स्थळप्रत) स्वत:कडे ठेविल आणि २४ तासाचे आत दुसरी, तिसरी व चौथी प्रत अनुक्रमे वनपाल, विभागीय कार्यालय व परिक्षेत्र कार्यालयात थेट रवाना करेल.

**६.१२.०३** जर इतर कोणत्याही अधिका-याद्वारे गुन्हा नोंदविला गेला असेल तर, वरील प्रमाणे, नोंदविलेल्या गेलेल्या 'पी.ओ.आर.'च्या प्रमाणित प्रती, कोणतेही विलंब न लावता, वर नमूद केलेल्या अधिका-यांपर्यत पोहोचतील, याची सुनिश्चिती करेल.

**६.१२.०४** वनरक्षक आपल्या प्रथम अहवालाचे पुस्तक नेहमीच त्याच्या सोबत ठेवेल आणि वरिष्ठ अधिका-यांचे मागणीवर निरिक्षणासाठी सादर करेल.

**६.१२.०५** कोणत्याही परिस्थितीत प्रथम अहवाल हा पाकिटात इतर कागपत्रांसह संलग्न केला जाणार नाही आणि ज्या पाकिटात ते असेल त्यावर "**प्रथम अहवाल**" ठळकपणे चिन्हांकित केला जाईल.

**II-तपास नोंदवही आणि अहवाल**

**६.१२.०६** प्रत्येक परिमंडळ अधिकारी हा विहीत नमून्यात "**तपास नोंदवही**" ठेवेल आणि वरील परिच्छेद ६.१२.०२ नुसार प्रथम अहवाल प्राप्त होताच किंवा यथास्थितीत, स्वत: गुन्हा नोंदविल्यानंतर, त्या बाबतीत तात्काळ नोंदवहीत नोंदी घेईल.

**६.१२.०७** त्यानंतर, तो वन-गुन्ह्यासंदर्भात तपास करेल आणि १५ दिवसांच्या आत त्याचा तपास अहवाल वनक्षेत्रपालकडे सादर करेल. तो त्याबाबतच्या नोंदी तपास नोंदवहीत सुध्दा पुर्ण करेल. परिमंडळ अधिकारी हा, पंचनामा तयार करणे, गुन्हा तडजोड करण्यास आरोपी तयार असल्यास, त्याचेकडून विहीत नमून्यात हमीपत्र घेणे, आरोपी आणि संबंधित साक्षीदार असल्यास त्यांचे बयान नोंदविण्यासह यथाशक्य पुर्ण तपास केला जाईल, याची सुनिश्चिती करेल. आरोपीस, त्याच्या वतीने साक्षीदार हजर करण्याबाबत औपचारिकरित्या विचारणा केली जाईल आणि तसे करण्यास त्यांनी नकार दिल्यास, त्याच्या बयानात तशी नोंद घेतली जाईल.

**६.१२.०८** तपास अहवालात कोणतेही पत्र किंवा अभिमत प्रदर्शित करणारे निवेदन संलग्न करण्यात येणार नाही. तथापि, अभियोजनासाठी साक्षीदार म्हणून त्याच्या निवेदनामध्ये त्यासंदर्भातील कागदपत्र अहवालात समाविष्ट करता येईल.

**६.१२.०९** वरील कार्यपद्धती ही भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत तपास करण्याचे कर्तव्य सोपविलेल्या परिमंडळ अधिका-याकरिता लागू आहे.

**६.१२.१०** तपास करणे वगळता, वर नमूद केलेली इतर सर्व कार्यप्रणाली वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गतच्या गुन्ह्यांनाही लागू असेल. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करण्याकरिता त्या अधिनियमाच्या कलम ५०(८) खाली, सहाय्यक वनसंरक्षक पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. उक्त पोटकलमाचे उपकलम (a) ते (d) अन्वये तपास अधिका-यांना इतर काही अधिकारही प्रदान करण्यात आले आहेत. सबब, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्ह्यांचा तपास, अधिनियमाच्या कलम ५०(८) अंतर्गत अधिकार नसलेल्या इतर कोणत्याही अधिका-यांने केल्यास, न्यायालयासमोर नंतर होणा-या संपरिक्षेत अथवा इतर कोणत्याही प्राधिकरणसमोर कार्यवाहीत टिकणार नाही. असे जरी असले तरी, कलम ५० (८) अंतर्गत अधिकार प्राप्त अधिका-यांपेक्षा कमी दर्जा असलेले वन अधिकारी हे उक्त अधिनियमातील कलम ५० चे उपकलम (१), (३) आणि (४) अंतर्गत त्यांचेवर बांधील असलेले कर्तव्य बजावण्यास कर्तव्यबद्ध आहेत. वस्तुत: उपकलम (५) मधील विशिष्ट तरतूदी प्रमाणे

उपकलम (४) मधील कर्तव्ये पार पाडण्यास ठरलेले अपयश, संबंधित व्यक्तीस उक्त अधिनियमांविरुध्द गुन्ह्यांसाठी दोषी ठरवितो.

## III-वनपरिक्षेत्र नोंदवही

**६.१२.११** वनक्षेत्रपाल, हा त्याच्या कार्यालयात "**वनपरिक्षेत्र गुन्हा नोंदवही**" ठेवेल.

**६.१२.१२** वर नमूद केल्याप्रमाणे तपास अहवाल प्राप्त झाल्यावर कार्यालयीन अभिलेख अथवा त्याच्या स्वत:च्या माहितीनुसार वनक्षेत्रपालाच्या निदर्शनास आले की मागील ताकीद किंवा दोषी म्हणून निवाडा किंवा विशेष शिक्षेचे कारण परिमंडळ अधिकारी द्वारे त्याचे तपासणी अहवालात नोंदविण्यात आले नाही तर तो त्यासंदर्भात संपोषक कागदपत्रांचा समावेष तपास अहवालात करेल. कोणत्याही निमित्ताने तपास अहवालात अतिरिक्त नोंद किंवा बदल करण्यात येणार नाही.

**६.१२.१३** वनक्षेत्रपाल हा स्वतः, भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ७२, ज्यात वनगुन्ह्याची चौकशी करणे आणि अशा चौकशीच्या दरम्यान पुरावे प्राप्त करणे व नोंदविणे या गोष्टींचा समावेश आहे, साठी शक्तीप्रदत्त आहे. सबब, जो पर्यंत भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत गुन्ह्यांच्या संबंध आहे, वनक्षेत्रपाल हा त्या अधिनियमानुसार प्रदत्त शक्तींचा वापर करेल.

**६.१२.१४** वनक्षेत्रपालच्या मते, जर परिमंडळ अधिका-यांने केलेला तपास सर्व बाबतीत परिपूर्ण असेल तर तो स्वतःच्या अभिप्राय वेगळ्याने त्यात नोंदवून, भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ६८ किंवा यथास्थितीत कलम ६१-अ अंतर्गत पुढील कार्यवाहीकरिता सहाय्यक वनसंरक्षक/ उपविभागीय वन अधिकारी यांचे कडे सादर करेल. प्रकरणाची गुणवत्ता विचारात घेता, जर तो न्यायालयात खटला दाखल करण्यास पात्र आहे, असे त्याचे अभिमत असेल तर तो न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करेल. सहाय्यक वनसंरक्षक/उपविभागीय वन अधिकारी यांचेकडे सरकारजमा प्रयोजनार्थ सादर केलेल्या प्रकरणात, सरकारजमाची कार्यवाही बाबत परिणामांची प्रतिक्षा न करता, आवश्यक असल्यास, वनक्षेत्रपाल न्यायालयात तक्रार दाखल करण्याची सुनिश्चिती करेल. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतूदींचा विपरीत, भारतीय वन अधिनियम, १९२७ मध्ये न्यायालयात तक्रार दाखल करण्यास कोणत्या दर्जाच्या अधिकारी सक्षम आहे, या बाबत कोणतेही निर्बंध नाही. त्यामुळे, वनपाल किंवा वनरक्षक यांना न्यायालयात तक्रार दाखल करण्यास कोणतीही निर्बंध नाही. तथापि, पुरेशी सावधगिरी आणि शासनचे हित जोपासण्याच्या दृष्टीने, जर वनपाल किंवा वनरक्षकाकडून तक्रार दाखल करावयाची असेल, तक्रारीचा मसुदा वनक्षेत्रपालद्वारे पूर्वीच मंजूर होणे नेहमी इष्ट ठरेल.

**६.१२.१५** मात्र जर वनक्षेत्रपालच्या मते प्रकरणात अधिक तपास आवश्यक असेल तर तो कोणत्याही सबबी परिमंडल अधिका-यांकडे कागदपत्रे परत करणार नाही, परंतु कोणतेही विलंब न लावता, परिच्छेद ६.१२.१४ मध्ये नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कायद्यानुसार स्वत: पुढील तपास करेल.

**६.१२.१६** दुसरीकडे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत तपास करणे, शोध वारंट जारी करणे, साक्षीदारांची उपस्थिती लागू करणे, कागदपत्रे आणि साहित्यांचा शोध घेणे व ते प्रस्तुत करण्यास भाग

पाडणे आणि पुरावे प्राप्त करणे व नोंदविणे करीता कलम ५०(८) अंतर्गत सहाय्यक वनसंरक्षक पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सबब, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ शी संबधित गुन्हे, हे त्या संबंधात सक्षम असलेल्या अधिका-यांद्वारे हाताळली गेली पाहिजे.

**IV-<u>सहाय्यक वनसंरक्षक गुन्हा नोंदवही</u>**

**६.१२.१७** भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६१-A व ६८ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम ५३, ५४ अंतर्गत शक्तींचा वापर करण्यासाठी अधिकार सहाय्यक वनसंरक्षक यांना प्रदान करण्यात आले आहे. म्हणून तो प्रकरणाची तपासणी करेल व प्रकरणाची गुणवत्तेच्या आधारे, कायदयानुसार संबंधित अधिनियमांतर्गत आदेश पारीत करेल आणि आदेशाच्या प्रमाणित प्रती संबंधित पक्षकारांना, वनक्षेत्रपाल व उप वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी यांना प्रेषित करेल. कलम ६१-A अंतर्गत पारित केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत कलम ६१-C अंतर्गत विनिर्दिष्ट प्राधिका-यांसही सादर केल्या जातील. वरील नमूद कायदयातील विहीत पुर्नविलोकन किंवा अपिलिय प्राधिकरणासमोर अथवा इतर वैधानिक प्राधिकरणासमोर नंतर होणा-या कार्यवाहीसाठी मूळ कागदपत्रांची गरज लागण्याची शक्यता असल्याकारणे, प्रकरणाची मूळ कागदपत्रे, सहाय्यक वनसंरक्षक हा स्वत:कडे ठेऊन त्याचे जतन करेल. तथापि त्यासंदर्भात, संबंधित वनक्षेत्रपालच्या विनंतीवर, अशा प्रकरणांच्या प्रमाणित प्रती पुरवेल.

**६.१२.१८** वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गच्या गुन्हे संदर्भात तपास पूर्ण झाल्यानंतर जर तो न्यायालयात खटला दाखल करण्यास पात्र आहे असे, त्याचे मत असल्यास, तो स्वत: न्यायालयात तक्रार दाखल करील किंवा उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांस कळवून, तसे करण्यास संबंधित वनक्षेत्रपालास निर्देशित करेल. जर त्याच्या मते प्रकरण कलम ५४ अंतर्गत हाताळणे उपयुक्त असेल, तर तो तसा अहवाल उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांना सादर करेल.

**V-<u>विभागीय वन गुन्हा नोंदवही</u>**

**६.१२.१९** उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी हे "**विभागीय गुन्हा नोंदवही**" ठेवतील. सदर नोंदवहीत भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, इत्यादी अंतर्गतचे प्रत्येक गुन्ह्याचे प्रथम प्रतिवृत्त, तपास, चौकशी, तक्रार दाखल करणे, अभिसंधान व सरकारजमा, इत्यादी चे आदेश तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३, ५४ अंतर्गत पारित आदेश व गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर कनिष्ठ अधिका-यांद्वारे दरम्यानचे काळात प्रत्येक टप्प्यावर वेळोवेळी कळविलेला अहवाल, इत्यादी नोंदवहीत नोंदविले जातील.

**६.१२.२०** उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी सुनिश्चित करेल की विभागीय गुन्हा नोंदवही अद्यावत राखली जाईल आणि गुन्हे प्रकरणांशी संबंधित सर्व नियतकालिक अहवाल या नोंदवहीच्या आधारे वरिष्ठांना सादर केली जाईल.

**६.१२.२१** ज्या गुन्ह्यांबाबतीत न्यायालयात तक्रार दाखल झाली असेल, त्या गुन्ह्यांचे काटेकोरपणे सनियंत्रण करतील आणि प्रकरणाचे गुणवत्तेनुसार योग्य ज्येष्ठतेच्या आणि प्रकरणाची माहीती असलेल्या अधिका-याद्वारे पाठपुरावा केला जाईल, हे ही ते सुनिश्चित करतील.

**६.१२.२२** न्यायालयात खटला दाखल करण्यायोग्य प्रकरणी न्यायालयात वेळीच तक्रार दाखल केली जाईल, हे ही ते सुनिश्चित करतील.

**६.१२.२३** उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी हे भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६१ अंतर्गत सुद्धा शक्तीप्रदत्त आहेत. तथापि, अशा अधिकारांचा वापर करतांना ते सावधगिरी बाळगतील आणि या तरतुदीनुसार दिलेले आदेश त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना सादर करतील.

**६.१२.२४** शंकांचे निरसन करण्यासाठी स्पष्ट करण्यात येत आहे की, भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ६१-A, ६८ अंतर्गत आणि महाराष्ट्र महसूल संहिता १९६६च्या कलम ५३, ५४ अंतर्गतच्या शक्ती उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांनाही देण्यात आली आहे. सबब अशा प्रकारच्या अधिकारांचा वापरकरण्यासाठी उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी हे, सहाय्यक वन संरक्षक संदर्भात विहीत केलेल्या कार्यपद्धती अवलंबतील.

**VI-<u>सर्वसामान्य</u>**

**६.१२.२५** संबंधित वनक्षेत्रपाल आणि सहाय्यक वन संरक्षक यांचे (वास्तविक त्याहीपेक्षा जास्त उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांचे) कर्तव्य असेल की ते प्रथम अहवालाच्या दिनांकापासून प्रकरणाच्या प्रगतीवर लक्ष ठेवतील आणि उपरोक्तपैकी प्रत्येक अधिका-कडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्हेप्रकरणे कायद्याप्रमाणे अवाजवी विलंबाशिवाय हाताळले जातील, याची सुनिश्चिती करेल.

**६.१२.२६** भारतीय वन अधिनियम, १९२७ व/किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गतचे न्यायालयात खटला दाखल करावयाचे गुन्हे, हे गुन्हा उघडकीस आल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत न्यायालयात दाखल केले जातील, याबाबत उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी खात्री करतील. भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६१-A अंतर्गत आणि महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३, ५४ अंतर्गतची प्रकरणे सुध्दा ६० दिवसांच्या मुदतीत त्या अधिनियमांतर्गत सक्षम प्राधिका-यांकडे दाखल होतील. भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६८ अंतर्गत किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या कलम ५४ अंतर्गतची प्रकरणे सुध्दा त्याच कालमर्यादेत निकाली काढली जातील, याची सुध्दा ते खात्री करतील.

**६.१२.२७** जो पर्यंत वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गतचे गुन्ह्यांचा संबध आहे, त्या बाबतीत केंद्र सरकार अधिसुचनेद्वारे, वनसंरक्षक पेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिका-यांस किंवा गुन्हा घडलेले स्थळ ज्यांचे कार्यक्षेत्रात आहे, असे वन अधिका-यांना सदर कायदा आणि त्या अंतर्गतचे नियमांचे प्रथमदर्शी उल्लंघन करणारे व्यक्ति / व्यक्ती विरुध्द त्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या न्यायालयात, तक्रार दाखल करण्यास प्राधिकृत करु शकते. त्यानुसार, न्यायालयात तक्रार दाखल करण्याचे अधिकार,

वन (संवर्धन) नियम २००३ च्या नियम ९ अंतर्गत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या प्रादेशिक कार्यालयातील अधिका-यास प्रदान आहेत. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यासंदर्भात उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी स्वतः प्रकरणांची तपासणी करतील. तद्नंतर, प्रकरण न्यायालयात खटला दाखल करण्यास योग्य आहे, असे निष्कर्षाप्रत आल्यास, तर प्रमाणित अंग्रेजी भाषांतरासह (जेथे-जेथे आवश्यक असेल) प्रकरणाचे प्रमाणित प्रतींसह परिपूर्ण औपचारिक प्रस्ताव, नियम ९ अंतर्गत तक्रार दाखल करण्यासाठी ७५ दिवसांचे आत त्यांचे वरिष्ठांस सादर करतील.

**६.१२.२८** लक्षात घेणे आवश्यक आहे की, ही कार्यपध्दती केवळ भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांसंदर्भात आहे. कोणत्याही परिस्थितीत, भारतीय दंड संहिता किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गतच्या गुन्ह्यांकरीता हे लागू असणार नाही. अशी प्रकरणे वरिष्ठांना अवगत करून पोलिस किंवा सक्षम प्राधिकरणास त्वरित कळविले जातील.